# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 20 January 2026

## Time 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक २० जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता

****

स्वित्झर्लंडमध्ये दावोस इथं आयोजित जागतिक आर्थिक परिषदेत कालच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारनं विविध कंपन्याबरोबर विक्रमी साडेचौदा लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूक करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. याअंतर्गत स्वाक्षरी केलेल्या १९ सामंजस्य करारांमुळे विविध क्षेत्रांमध्ये १५ लाखांहून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होण्याचा अंदाज आहे. हे करार राज्याच्या विकसित महाराष्ट्र २०४७: व्हिजन आणि पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या महत्त्वाकांक्षी ध्येयाशी सुसंगत आहेत, असं राज्य सरकारच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

यावेळी राज्य शासनाने नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात योकी ग्रीन एनर्जी प्रा. लि. यांच्याबरोबर चार हजार कोटी रुपयांचा करार, लोढा डेव्हलपर्स लिमिटेड बरोबर एक लाख कोटी रुपयांचा करार, अन्न आणि कृषी क्षेत्रात कार्ल्सबर्ग यांच्याबरोबर ५०० कोटी रुपयांचा करार, विदर्भात पोलाद क्षेत्रात सुरजागड इस्पात लिमिटेड बरोबर २० हजार कोटी रुपयांचा करार, तर लॉजिस्टिक्स क्षेत्रात एमएमआरडीए आणि एसबीजी ग्रुप यांच्यात २० अब्ज डॉलर्सचा करार करण्यात आला.

****

भारतानं २०२५ च्या आर्थिक वर्षात ४७ अब्ज डॉलर्स म्हणजेच चार लाख १५ हजार कोटी रुपयांची विक्रमी इलेक्ट्रॉनिक्स निर्यात साध्य केली आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाजमाध्यमावरुन ही माहिती दिली. पीएलआय आधारित योजनेतून उत्पादित स्मार्टफोन निर्यातीतून ३० अब्ज डॉलर्सची निर्यात करण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०१५ पासून इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या निर्यातीत ११ पट वाढ झाली असून, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात आता भारत जगातला तिसरा सर्वात मोठा निर्यातदार देश आहे. इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या उत्पादनामुळे महिलांच्या मजबूत सहभागासह २५ लाख नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या असून एमएसएमईसाठी मोठ्या संधी आणि तरुणांना दीर्घकालीन कौशल्य उपलब्ध झाल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

****

भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी आज अधिकृत घोषणेची अपेक्षा असून, दुसऱ्या कोणाचाही उमेदवारी अर्ज दाखल न झाल्यानं नितीन नबीन यांची निवड जवळपास निश्चित मानली जात आहे. नितीन नबीन यांनी काल आपला उमेदवारी अर्ज दाखल केला होता. भाजपाचे खासदार अनुराग ठाकूर यांनी नबीन यांच्यासारख्या युवा नेत्याची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड होणं हा पक्षासाठी अभिमानाचा क्षण असल्याचं म्हटलं आहे. या निर्णयामुळे देशभरातल्या युवा कार्यकर्त्यांना सकारात्मक संदेश मिळाल्याची भावना भाजपच्या अनेक नेत्यांनी व्यक्त केली.

****

येत्या २६ जानेवारीला ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्लीत होणाऱ्या संचलनासाठी दहा हजार विशेष पाहुणे आमंत्रित करण्यात आले आहेत. देशभरातले नवोन्मेषक, बचत गट, तसंच विविध सरकारी उपक्रमांमध्ये विशेष कामगिरी करणाऱ्यांचा या पाहुण्यांमध्ये समावेश आहे. याशिवाय जागतिक पॅरा ऑलिम्पिक विजेते, नैसर्गिक शेती करणारे शेतकरी, तसंच पीएम स्माईल योजनेतून पुनर्वसन झालेले तृतीयपंथी आणि भिक्षेकरी यांनाही आमंत्रित करण्यात आलं आहे. यावर्षीच्या संचलनात सीआरपीएफ आणि सशस्त्र सीमा बलाच्या महिला अधिकाऱ्यांचं मोटरसायकल पथकही सामील होणार आहे.

****

छत्तीसगडच्या गरियाबंद जिल्ह्यात काल नऊ नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर शरणागती पत्करली. त्यात सहा महिलांचाही समावेश आहे. या नऊ जणांवर एकूण ४८ लाख रुपयांची बक्षिसं होतं. पोलीस महासंचालकांच्या आवाहनानंतर त्यांनी शरणागती पत्करली असून काल झालेल्या कार्यक्रमात या नक्षलवाद्यांनी त्यांच्याकडील अत्याधुनिक बंदुका आणि इतर शस्त्रं सुपूर्द केली. या नक्षलवाद्यांच्या शरणागतीमुळे आता जिल्ह्यात एकही नक्षलवादी सक्रीय नसल्याची माहिती पोलीस महासंचालकांनी दिली आहे.

****

राज्यातल्या आदिवासी भागात कुपोषणामुळे अर्भक आणि गर्भवती महिलांचे मृत्यू रोखण्यात अपयश आल्याचं सांगत मुंबई उच्च न्यायालयाने काल पुन्हा राज्य सरकारला फटकारलं. मेळघाट परिसरात गर्भवती, स्तनदा माता आणि बालकांच्या मृत्यू प्रकरणी दाखल याचिकांवर न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. सरकारने या समस्येचं निराकरण करण्याची इच्छाशक्ती दाखवायला हवी असं खंडपीठाने म्हटलं आहे. हे मृत्यू रोखण्यासाठी सरकारचे प्रयत्न अपुरे असून या भागात किमान आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात असंही न्यायालयाने सांगितलं.

****

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त छत्रपती संभाजीनगर शहरातल्या शासकीय विभागीय ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शनाचं उद्घाटन आज मराठी प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष कुंडलिकराव अतकरे यांच्या हस्ते झालं. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी निरंतर वाचन आवश्यक असून, शासकीय विभागीय ग्रंथालयातल्या ग्रंथांचं दालन सर्वांसाठी खुलं असल्याचं ते यावेळी म्हणाले.

****

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान पाच टी ट्वेंटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला उद्यापासून प्रारंभ होत आहे. मालिकेतला पहिला सामना नागपूर इथं जामठा क्रीडासंकुलावर होणार आहे. या सामन्यासाठी नागपुरात प्रेक्षक मोठ्या संख्येनं येण्याची शक्यता लक्षात घेता, शहर पोलिसांनी वाहतुकीचं चोख नियोजन केलं आहे. प्रेक्षकांसाठी मेट्रो स्टेशनपासून क्रीडासंकुलापर्यंत फीडर बसची मोफत सुविधा देण्यात येणार आहे.

****